# ५. इतर क्षेत्र

## पशुपक्षी संवर्धन

पशुपक्षी संवर्धनात सर्वसाधारणपणे गोपालन आणि कुक्कुट पालन घरगुती स्वरूपात केले जाते. गाईच्या आणि कोंबडीच्या विविध जातींचा परिचय येथे करून घेऊया.

### गाईंच्या जाती

**(१) खिल्लार गाय**

**स्थान :** पश्चिम महाराष्ट्र

**रंग :** पांढरा

**शरीर :** लांबट

**शिंग :** टोकदार व पुढे थोडी वळलेली

**दूध :** तीन ते चार लिटर (अंदाजे)



**(२) गीर गाय**

**स्थान :** सौराष्ट्र (गुजरात), महाराष्ट्र

**रंग :** तांबडा,

**शरीर :** धिप्पाड, लांब कान

**शिंग :** जाड, आखूड व आत वळलेली

**दूध :** सात लिटर (अंदाजे)



**(३) गवळाऊ गाय**

**स्थान :** विदर्भ

**रंग :** पांढरा

**शरीर :** मध्यम

**शिंग :** आखूड

**दूध :** तीन ते पाच लिटर (अंदाजे)



## (४) होलस्टन गाय

**स्थान :** भारत व परदेश

**रंग :** काळा व पांढरा

**शरीर :** मोठे

**शिंग :** अतिशय लहान

**दूध :** दहा ते बारा लिटर (अंदाजे)





## (५) जर्सी गाय

**स्थान :** भारत व इंग्लंड

**रंग :** फिकट लाल

**शरीर :** मोठे

**शिंग :** बारीक व टोकदार

**दूध :** दहा ते बारा लिटर (अंदाजे)

# कोंबडीच्या जाती

## (१) व्हाईट लेगहॉर्न

**स्थान :** इटली देश

**रंग :** पांढरा

**उत्पन्न :** वर्षाला २०० ते २५० अंडी





## (२) ब्राऊन लेगहॉर्न

**स्थान :** इटली

**रंग :** पिवळा, काळा, तांबडा, राखाडी या रंगाचे मिश्रण

**उत्पन्न :** वर्षाला २०० ते २२५ अंडी



## (३) ब्लॅक मिनार्का

**स्थान :** स्पेन

**रंग :** काळा

**उत्पन्न :** वर्षाला १२० अंडी



## (४) ऱ्होड आयर्लंड रेड

**स्थान :** अमेरिकेतील ऱ्होड आयर्लंड

**रंग :** लाल किंवा तपकिरी

**उत्पन्न :** २०० ते ३०० अंडी
(तपकिरी रंग)



## (५) ब्रॉयलर कोंबडी

**रंग :** पांढरा

**उत्पन्न :** अतिशय कमी वेळेत जास्त मांस वाढवून खाण्यासाठी ही जात वापरली जाते. ब्रॉयलर कोंबड्यांचे मांस कोवळे व लुसलुशीत असते.



## (६) अमेरिकन पांढरीशुभ्र कोंबडी

**स्थान :** अमेरिका

**रंग :** पांढरा

**उत्पन्न :** वर्षभरात सुमारे १८० अंडी

◆ पशुपक्षी संवर्धन केल्याने अर्थोत्पादन कसे वाढते याचे मार्गदर्शन करावे. परिसरात आढळणाऱ्या गायी व कोंबडी यांच्या प्रजातींविषयी माहिती द्यावी.

# माहिती तंत्रज्ञान

## • डेस्कटॉपची ओळख

**अ) आयकॉन ब) वॉलपेपर क) टास्कबार**

**• डेस्कटॉप**



संगणकाचा वीज पुरवठा सुरू केल्यानंतर तात्काळ आज्ञा देता येत नाहीत. संगणकाला त्याच्या स्मृतीमधून ऑपरेटिंग सिस्टिम मिळवावी लागते. या कामाला 'बूटिंग' म्हणतात. बूटिंग पूर्ण झाल्यावर दिसणाऱ्या स्क्रीनला 'स्टार्टिंग डेस्कटॉप' म्हणतात.

संगणक सुरू झाल्यावर संगणकाच्या मदतीने कोणकोणती कामे करता येतात. त्यांची छोटी रूपे म्हणजे आयकॉन्स. हे आयकॉन्स मॉनिटरवर दिसतात. म्हणून याच पृष्ठभागाला 'डेस्कटॉप' म्हणतात. कामांसाठी वापरण्याच्या प्रोग्राम्सची संक्षिप्त रूपातील चित्रे संगणकाच्या डेस्कटॉपवर असतात किंवा तयार करता येतात. या संक्षिप्त रूपातील चित्रांना 'आयकॉन' असे म्हणतात. आयकॉनवर माऊसने डबल क्लिक केले असता संबंधित ॲप्लिकेशन सुरू होते.

**वॉलपेपर :**

बूटिंग पूर्ण झाल्यानंतर पार्श्वभूमीवर दिसणाऱ्या चित्राला '**वॉलपेपर**' म्हणतात. तुम्ही काढलेले एखादे चित्रसुद्‌धा वॉलपेपर म्हणून वापरता येते.

**टास्कबार :**

संगणकावर चालू असलेल्या कामांच्या विंडोची छोटी रूपे ज्या पट्टीवर दिसतात, त्यास '**टास्कबार**' म्हणतात. हा टास्कबार बूटींग पूर्ण झाल्यानंतर तळाशी दिसतो.

**कॅल्क्युलेटरची (Calculator) ओळख :**




संख्यांची आकडेमोड अत्यंत जलद व अचूकपणे करता यावी यासाठी **कॅल्क्युलेटरचा** वापर करता येतो. संगणकावर काम करताना गणिती प्रक्रिया करण्यासाठी कॅल्क्युलेटरची गरज लागते.

**कॅल्क्युलेटरचे प्रकार**

(१) **स्टँडर्ड कॅल्क्युलेटर** (Standard Calculator)

(२) **सायंटिफिक कॅल्क्युलेटर** (Scientific Calculator)

**कॅल्क्युलेटर :**

स्टार्ट – प्रोग्रॅम्स – ॲक्सेसरीज – कॅल्क्युलेटर

**माझी कृती :** संगणक सुरू करून संगणकाच्या डेस्कटॉपचे निरीक्षण करा.

## रस्ता सुरक्षा



थांबा



पुढे उभा उतार आहे.



पुढे शाळा आहे.



रेल्वे क्रॉसिंग



पुढे उभी चढण आहे.



नो पार्किंग
येथे गाडी उभी करू नये.



डावे वळण
डावीकडे वळावे.



हॉर्न वाजवणे.



पुढे पुढे जावे



उजवे वळण
उजवीकडे वळणे



हॉस्पिटलकडे




पार्किंग
येथे गाडी उभी करावी.

**माझी कृती :** ऑनलाईन शिक्षणात वापरलेल्या माहिती तंत्रज्ञान साहित्याचा तुम्हाला आलेला अनुभव लिहा.